**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ**

जा.क्र.कबचौउमवि/१६/बातमी-प्रवेश/हस्तदेय दि.२७ जुलै, २०१९

**बातमी क्र.१**

जळगाव दि. २७ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयातील प्रथम वर्ष एम.एस्सी. अभ्यासक्रमासाठीच्या प्रथम वर्षात ज्या विद्यार्थ्यांना अद्याप पर्यंत प्रवेश मिळाला नाही अशा विद्यार्थ्यांसाठी **सोमवार दि.२९ जुलै, २०१९** रोजी **सकाळी ११** वाजता समुपदेशन फेरीचे आयोजन विद्यापीठात करण्यात आले आहे.

विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयातील एम.एस्सी. प्रथम वर्ष अभ्यासक्रमाच्या २ हजार ६२३ जागांवर प्रवेशासाठी केंद्रीय प्रवेश पद्धतीद्वारे प्रवेश प्रकिया सुरू असून आता पर्यंत १ हजार ७४३ जागांवर प्रवेश देण्यात आले असून उर्वरित ८८० जागांवर प्रवेश देण्यासाठी समुपदेशन फेरीचे आयोजन विद्यापीठाच्या स्कुल ऑफ इनव्हर्यमेंटल सायन्सेस येथे एम.ए./एम.एस्सी. भूगोल, (Geography) बॉटनी, (Botany) व पर्यावरणशास्त्र (Environmental Science) या विषयांसाठी, पर्यावरणशास्त्र प्रशाळा येथे, संगणकशास्त्र, (Computer Sciences) माहिती तंत्रज्ञान, (Information Technology) सांख्यिकीशास्त्र, (Statistics) गणित, (Mathematics), भौतिकशास्त्र, (Physics), इलेक्ट्रॉनिक्स (Electronics), या विषयांसाठी ज्ञानस्त्रोत केंद्र (Central Library Building) येथे तर जैविकशास्त्र प्रशाळा येथे जैविकशास्त्र, (Life Sciences), या विषयासाठी, रसायनशास्त्र प्रशाळा येथे रसायनशास्त्र, (Chemistry) या विषयासाठी करण्यात आले आहे. सर्व विषयातील आर्थिक दृष्टया मागासलेल्या (All EWS Candidates) विद्यार्थ्यांसाठी ऑनलॉईन एक्झामिनेशन सेंटर, स्कुल ऑफ मॅथेमेटीकल सायन्सेस येथे करण्यात आले आहे. याबाबतची सविस्तर माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

---

**बातमी क्र.२**

जळगाव दि.२७ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठा अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता एम.एस.डब्ल्यू या अभ्यासक्रमास केंद्रीय प्रवेश पद्धतीद्वारे प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. समाजकार्य महाविद्यालये व विद्यापीठ विभागात रिक्त असलेल्या जागांवर प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी सोमवार दि.२९ जुलै,२०१९ रोजी सकाळी ९:३० वाजता विभागात हजर रहावे असे आवाहन विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

**बातमी क्र.३**

जळगाव दि. २७(                    ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठातापदी प्रा.अंबालाल बाबुलाल चौधरी यांची मुलाखतीद्वारे आज निवड करण्यात आली.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठातापदासाठी जाहिरातीद्वारे अर्ज मागविण्यात आले होते. या पदाच्या मुलाखती आज दि.२७ जुलै,२०१९ रोजी विद्यापीठात आयोजित करण्यात आल्या होत्या. सदर मुलाखती मधुन प्रा. अंबालाला बाबुलाल चौधरी यांची विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठातापदी निवड करण्यात आल्याचे विद्यापीठाकडून जाहिर करण्यात आले आहे.

प्रा. अंबालाल चौधरी हे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या जैविकशास्त्र प्रशाळेतील मायक्रोबॉयालाजी या पदवुत्तर विभागाचे प्रमुख आहेत. गेल्या २० वर्षापासून प्रा. चौधरी हे सूक्ष्म्जीवशास्त्र विषयाच्या अध्यापनाचे काम विद्यापीठात करीत आहेत. सद्या ते विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य आहेत. यापुर्वी प्रा.चौधरी हे विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव व प्रभारी संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यापदावर काही काळ कार्यरत होते.

---------------------------------------------------------------------------------------------------------

जा.क्र.कबचौउमवि/१६/बातमी-प्रवेश/हस्तदेय                                        दि.२७ जुलै, २०१९

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
महोदय,

उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिद्ध करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

(प्रमोद आ.चव्हाण)
जनसंपर्क अधिकारीयांच्या करीता